MHGA050007562022

# <u>न्यायालय विद्यमान न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी) देसाईगंज</u>

**(न्यायाधीश : आ.ऋ. भडके)**

**<u>किरकोळ फौजदारी अर्ज क्रं.—१३६/२०२२</u>**

**(CNR-MHGA050007562022)**

| | |
|---|---|
| अर्जदार | **१. श्री नितीन विश्वमीत्र शर्मा,**<br>वय अंदाजे —३५ वर्षे, धंदा— व्यवसाय<br>राहणार—किदवाई वार्ड, देसाईगंज,<br>तहसिल — देसाईगंज, जिल्हा— गडचिरोली.<br>**२. श्री आशिष दुर्योधन घोडमोडे,**<br>वय अंदाजे —३० वर्षे, धंदा— शेती,<br>राहणार—नैनपुर वार्ड, देसाईगंज,<br>तहसिल — देसाईगंज, जिल्हा— गडचिरोली.<br>**३. श्री राहुल लक्ष्मण उर्फ लक्ष्मणदास मंलग,**<br>वय अंदाजे —३० वर्षे, धंदा— व्यवसाय,<br>राहणार—सिंधी कॉलनी, देसाईगंज,<br>तहसिल — देसाईगंज, जिल्हा— गडचिरोली.<br>**४. श्री खालील अब्दुल कुरेशी,**<br>वय अंदाजे —४३ वर्षे, धंदा— मजुरी,<br>राहणार—हनुमान वार्ड, देसाईगंज,<br>तहसिल — देसाईगंज, जिल्हा— गडचिरोली.<br>**५. श्री होमराज रामकृष्ण बांगरे,**<br>वय अंदाजे —४६ वर्षे, धंदा— शेती,<br>राहणार—आंबेडकर वार्ड, देसाईगंज,<br>तहसिल — देसाईगंज, जिल्हा— गडचिरोली.<br>**६. श्री किशोर आत्माराम रामटेके,**<br>वय अंदाजे —३० वर्षे, धंदा— शेती,<br>राहणार—बोडधा, देसाईगंज,<br>तहसिल — देसाईगंज, जिल्हा— गडचिरोली. |

| **– वि रु ध्द –** | |
|---|---|
| **गैरअर्जदार** | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस स्टेशन, देसाईगंज,<br>तालुका–देसाईगंज, जिल्हा–गडचिरोली. |

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४५१ नुसार अर्ज</u>**

---

अर्जदारातर्फे – विद्वान वकील श्री. एम.आर.शेंडे,
गैरअर्जदारातर्फे – विद्वान सहाय्यक सरकारी वकील श्री.ए.पी.नाकाडे,

---

**<u>आदेश (निशाणी क्र.०१ वरील)</u>**

(दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजी पारित)

०१) अर्जदारांनी सदरचा अर्ज एकुण रक्कम रुपये ७५,५००/– चा ताबा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२) अर्जदारांचे असे म्हणने आहे की, ते मौजा–देसाईगंज, जिल्हा–गडचिरोली येथील स्थायी रहिवासी आहेत. ते सदर मालमत्तेचे मालक असुन त्यांचे ताब्यातून पोलीसांनी सदरची रक्कम बळजबरीने काढुन घेवुन अपराध क्रमांक ४८९/२०२१, (सरकार–वि–नितीन शर्मा व इतर आठ), महाराष्ट्र जुगार कायदाचे कलम १२ (अ) अन्वये तपास कामाकरीता जप्त केले असुन ती रक्कम न्यायालयात जमा केलेली आहे. परंतु आता सदरच्या मामल्याचा अंतीम निकाल लागला असुन सर्व अर्जदारांना निर्दोष सोडण्यात आलेले आहे व अपिलाची मुदतसुध्दा संपलेली आहे. सदरहु रकमेची अर्जदारांना त्यांच्या कौटुंबिक गरजा भागविण्याकरीता आवश्यकता आहे.

०३) विद्वान सरकारी वकील असे म्हणणे आहे की, संपरीक्षेदरम्यान अर्जदारांनी सदरच्या रकमेवर कोणताही हक्क सांगितलेला नाही आणि कोणत्याही साक्षीदाराने सदरची रक्कम आरोपीकडुन जप्त केल्याचे कथन केले नाही. त्यामुळे सदरची रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

०४) उभय पक्षाचे कथन व दस्ताऐवजांचे अवलोकन केले अर्जदाराच्या विद्वान वकीलाचा व विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

०५) प्रस्तुत प्रकरणात मुळ संक्षीप्त फौजदारी प्रकरण क्र.३४३/२०२१ चा अभिलेख बोलविण्यात आला. त्याचे अवलोकन करता पंचनाम्यात असे दिसुन येते की, सदरची रक्कम अर्जदारांकडुन पोलीसांनी तपासादरम्यान जप्त केली. मुळ प्रकरणातील पंच साक्षीदार फितुर झाल्याने पंचनामा सिध्द होवु शकला नाही. परंतु तपासी अधिकारी यांनी तयार केलेल्या जप्ती पंचनाम्यावरुन दिसुन येते की, अर्जदार नितीन शर्मा याच्या अंगझडतीत रुपये २०,०००/–, अर्जदार आशिष घोडमोडे याच्या अंगझडतीत रुपये १७,०००/–, अर्जदार राहुल मलंग याच्या अंगझडतीत रुपये ८,०००/–, अर्जदार खालीद कुरेशी याच्या अंगझडतीत रुपये १५,०००/– अर्जदार होमराज बांगरे याच्या अंगझडतीत रुपये ८,०००/– व अर्जदार किशोर रामटेके याच्या अंगझडतीत रुपये ७,५००/– असे जप्त करण्यात आले आहे. त्यावरुन सदरच्या रकमेवर अर्जदारांचा हक्क आहेत असे गृहित धरण्यास काहीही हरकत नाही. अपिल कालावधी संपलेला असल्यामुळे सदरची रक्कम न्यायालयात जमा ठेवण्यास कोणतेही उचीत कारण दिसुन येत नाही. सबब, अर्जदारांना सदरची रक्कमेचा

ताबा देणे न्यायाच्या दृष्टीने उचित ठरेल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :–

**// आ दे श //**

(०१) अर्जदार नितीन शर्मा यास रुपये २०,०००/–, अर्जदार आशिष घोडमोडे यास रुपये १७,०००/–, अर्जदार राहुल मलंग यास रुपये ८,०००/–, अर्जदार खालीद कुरेशी यास रुपये १५,०००/– अर्जदार होमराज बांगरे यास रुपये ८,०००/– व अर्जदार किशोर रामटेके यास रुपये ७,५००/– यांना खालील अटीवर देण्यात यावी :–

(i) अर्जदाराने रोख रकमेबाबत त्यांना देण्यात येणा–या रकमेइतके सुपूर्तनामा बंधपत्र सादर करावे.

(ii) सहायक अधिक्षक (वित्त) यांना निर्देशित करण्यात येते की, अर्जदारांची योग्य प्रकारे ओळख पटवुन आदेशाप्रमाणे सदरची रोख रक्कम त्यांना सुपुर्द करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by anandrao rushi bhadke
Date: 2022.11.11 16:40:24 +0530

(आ.ऋ. भडके)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
देसाईगंज.

स्थळ : देसाईगंज.
दिनांक : ११/११/२०२२